# प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे
दिनांक २१.०४.२०२६

**कैलास रामदास तेले, कृषि पर्यवेक्षक, तालुका कृषि कार्यालय, पिंप्री, ता.जि. धुळे यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती २८,०००/– रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम त्यांनी स्वत: स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| **ला. प्र. विभाग** | धुळे |
| **पो. ठाणे, गुन्हा नोंद क्र.** | देवपुर पो.स्टे. गुरनं. /२०२६ |
| **कलम व गुन्हा दाखल दि** | भ्र.प्र. कायदा कलम ७ प्रमाणे, दि.२१.०४.२०२६ |
| **आरोपीचे नांव, वय व कार्यालय** | **कैलास रामदास तेले, वय ४९ वर्षे, कृषि पर्यवेक्षक, तालुका कृषि कार्यालय, पिंप्री, ता. जि. धुळे रा. प्लॉट नं. २, अक्षय कॉलनी, गोंदुर रोड, धुळे मो. नं. ९४२३९१८५३०** |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | तडजोडीअंती २८,०००/– रुपये |

**थोडक्यात हकिगत :–** तक्रारदार यांचे नंदुरबार जिल्हयातील खांडबारा येथे ठिबक सिंचनचे साहित्य विक्रीचे रजिस्टर फर्म असुन त्याची मौजे शिरुड, ता. जि. धुळे येथे शाखा आहे. तक्रारदार यांच्या शिरुड येथील दुकानातुन परिसरातील शेतकरी शासकिय योजने अनुदान योजने अंतर्गत ठिबक सिंचनाचे साहित्य खरेदी करीत असतात. सदर खरेदी केलेल्या ठिबक सिंचनाचे शासकिय अनुदान मिळणे करीता महाडीबीटी यापोर्टलवर शेतकरी ऑनलाईन अर्ज करतात. तक्रारदार यांच्या दुकानातुन ठिबक सिंचनाचे साहित्य खरेदी केलेल्या शेतकऱ्यांच्या ठिबक सिंचनाच्या साहित्याची शेतात जोडणी केल्याची पडताळणी करुन ( मोका तपासणी ) कैलास तेले, कृषि पर्यवेक्षक यांनी त्यांच्या फाईल मंडळ, अधिकारी यांच्या लॉग ईनला पाठविले आहे. त्यानंतर कैलास तेले, कृषि पर्यवेक्षक यांनी तक्रारदार यांच्या दुकानात जावुन तक्रारदार यांच्या दुकानातुन ठिबक सिंचनचे साहित्य खरेदी केलेल्या शेतकऱ्यांची शेतात जावुन ठिबक साहित्याची जोडणी केल्याची मोका तपासणी करुन त्यांच्या फाईल मंडळ कार्यालियास पाठविल्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांच्याकडे ३५,०००/– रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी १०,०००/– रुपये स्विकारले असुन तक्रारदार यांच्याकडे उर्वरित २५,०००/– रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दि.२१.०४.२०२६ रोजी समक्ष कार्यालयात हजर राहुन तक्रार दिली होती.

सदर तक्रारीची दि.२१.०४.२०२६ रोजी पंचांसमक्ष पडताळणी केली असता कैलास तेले, कृषि पर्यवेक्षक यांनी तक्रारदार यांच्याकडे ३०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २८,०००/– रुपये लाच स्विकारण्याचे मान्य करुन आज रोजी सापळा कारवाई दरम्यान कैलास तेले, कृषि पर्यवेक्षक यांना तक्रारदार यांच्याकडुन २८,०००/– रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारतांना धुळे शहरातील जयहिंद चौकात रंगेहात पकडण्यात आले असुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| **पर्यवेक्षण अधिकारी** | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे |
| **सापळा अधिकारी** | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे |
| **तपास अधिकारी** | पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे |
| **सापळा पथक** | पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, संतोष पावरा, प्रविण मोरे, पोकॉ. मकरंद पाटील, प्रविण पाटील, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, चंद्रकांत सैंदाणे, मपोकॉ. रेश्मा परदेशी, पोहेकॉ. सुधीर मोरे, पोकॉ. जगदीश बडगुजर |
| **मार्गदर्शन** | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर"**


**संपर्क पत्ता** :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
**संकेतस्थळ** :– acbmaharashtra.gov.in
**ईमेल** :– dyspacbdhule@gmail.com
**टोलफ्री क्रमांक** :– १०६४
**दुरध्वनी क्रमांक** :– ०२५६२–२३४०२०
**व्हॉटसअॅप क्रमांक** :– ७७९८१६१०६४